**Activity (2018-19)**

Name of Activity: **Awarness on Certifiction of marathi Writting**

Date and Time: **17-02-2019 (09.00 am to 5.00 pm.)**

Target Group: **Arts Faculty students**

Venue: **Peth Vadgaon City**

Name of Organizer: **Department of Marathi**

Name of Resource Person: **Dr.P.B.Gaikwad,Porf.R.U.Dhavale Department of Marathi Shri Vijaysinha Yadav College, Peth Vadgaon**

**Details of the Event:** The Depatment Oraganized Awarness a project on Certification of marathi Writing Under the Guidence of Dr.P.B.Gaikwad,Prof.Ramchandra Dhavale.The home peth Vadgaon has been writing Peth Vadgaon as a part of tradition. As Concern to the Grammer rule of Marathi Out the home Gaon has been removed.

The department observed that the dot on the home eacha using by the government office and other office there for the department take a stant for the follwap 1962 Rule of the marathi Grammer . the department give to thr letter all offices of project.




सं क्षप्त ववेचन - मराठी वभागाच्या वतीने “ पेठ वडगांव ” नव्हे तर पेठ “वडगाव” लहा हि मोहिम जोरदारपणे राब वण्यात आली.श्री. वजय संह यादव महा वध्यालय ज्या पेठ वडगाव शहरात आहे,त्या शहराच्या नावाचा उल्लेख करताना हा शब्द शासनाच्या प्रमाणलेखन वषयक नियमानुसार लहिला

जात नाही,ही बाब महा वध्यालयातील मराठी वभागाच्या लक्षात आली.त्याचाच एक भाग म्हणून वभागातील डॉ.प्रशांत गायकवाड आ ण प्रा.रामचंद्र ढवळे यांच्या मार्गदर्शनाखाली वभागातील वध्यार्थ्यांनी हा उपक्रम हाती घेतला.या मध्ये वभागातील कु. शवानी खोत,कु.आकांक्षा जाधव,कु.भाग्यश्री चव्हाण, कु. मरजे,कु.प्रतिक्षा रसाळ,कु.नेहा माळवे,अ मत कोळी, शवराज जामदार.सु मत कांबळे इत्यादी वध्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.या वेळी पेठ वडगाव शहरातील सर्व शाळा, महा वध्यालये,नगरपा लका,सर्व शास कय ऑ फस,सर्व बँका इत्यादींना निवेदन देऊन “पेठ वडगाव ” हा शब्द नियमानुसार या प्रमाणे लहावा म्हणून निवेदन देण्यात आले.

## 'प्रमाणलेखनविषयक नियम जनजागृती'

प्रति,

मा. ..........................................................................

..........................................................................

..........................................................................

..........................................................................

## पेठ वडगांव नाही तर *पेठ वडगाव* लिहिणेबाबत

श्री विजयसिंह यादव कला व विज्ञान महाविद्यालय पेठ वडगाव मधील मराठी विभागाचे बी.ए. भाग ३ चे विद्यार्थी तसेच डॉ. प्रशांत गायकवाड आणि प्रा. रामचंद्र ढवळे यांनी सन २०१८-२०१९ या शैक्षणिक वर्षात 'प्रमाणलेखनविषयक नियम जनजागृती' हा शोध प्रकल्प हाती घेतला. याचाच एक भाग म्हणून अभ्यास करत असताना नगरपालिका, शासकीय कार्यालये, शाळा, महाविद्यालये, बँका, पोस्ट ऑफिस, इ. कार्यालयांमध्ये पेठ वडगाव हा शब्द 'पेठ वडगांव' असा चुकिच्या पद्धतीने लिहिला असल्याचे आढळून आले. लेटरहेड, बॅनर, डिजिटल बोर्ड, नेम प्लेट इ. वर हा शब्द चुकिचा असल्याचे पाहिले.

प्रमाणलेखनविषयक नियम, लेखनकोश, ऐतिहासिक कागदपत्रे यांचा अभ्यास करून हा संशोधन प्रकल्प हाती घेणेत आला.

पेठ वडगाव या गावाला सुमारे १५० वर्षांपेक्षा अधिक जुनी परंपरा व मोठा इतिहास आहे. गावात वडांच्या झाडांची संख्या अधिक असल्यामुळे त्याचे वडगाव हे नाव पडल्याचे बोलले जाते. पेठ वडगाव या नावाआधी हे गाव राजाचे वडगाव, कसबा वडगाव म्हणून प्रसिद्ध होते. शेजारीच 'मौजे वडगाव' या नावाचे एक छोटेसे दुसरे गाव असल्याचे पाहिले. नंतरच्या काळात पेठ वडगाव ही मोठी बाजारपेठ बनल्यामुळे यातील 'कसबा' हा शब्द हा मागे पडून बाजारपेठेतील 'पेठ' हा शब्द वडगाव या नावाच्या आधी घेण्यात आला व पुढे 'पेठ वडगाव' हीच या गावाची, शहराची स्वतंत्र ओळख निर्माण झाली. याविषयाची माहिती हाती आली.

स्पष्टोच्चारित अनुनासिकाबद्दल शीर्षबिंदू (अनुस्वार) द्यावा. अशा स्वरूपाचा प्रमाणलेखनविषयक नियम १९६२ साली झालेला असताना आजही आपण पेठ वडगाव या शब्दातील 'गा' या वर्णावर अनुस्वार देतो. ही गोष्ट अनेक लोकांकडून कळत न कळतपणे चुकिच्या पद्धतीने सुमारे ५७ वर्षांपासून घडत आहे. तसेच वडगाव ही मोठी बाजारपेठ असल्यामुळे पेठ वडगाव हा शब्द सुटा लिहावा की एकच लिहावा याविषयी देखील मोठा संभ्रम आहे. 'वडगाव' या नावाची अनेक गावे आहेत. एकाच नावाची अनेक गावे असतात तेंव्हा ती स्वतंत्रपणे ओळखण्यासाठी त्या त्या गावाच्या वैशिष्ट्यांवरून विशेषण लावण्याची प्रथा आहे. वडगाव ही मोठी बाजारपेठ म्हणून ओळखली जाते. त्यामुळे बाजार पेठेमधील पेठ हा शब्द स्वतंत्र असून ते विशेषण आहे. त्यामुळे ते लिहिताना वडगाव या गावाच्या नावाला जोडून न लिहिता पेठ वडगाव असे स्वतंत्र लिहावे.

पेठ वडगाव हे ऐतिहासिक गाव असून याला मोठी सांस्कृतिक परंपरादेखील आहे. या गावाच्या संस्कृतीविषयी प्रेम व्यक्त करताना भाषाविषयक सजगता बाळगूया. पेठ वडगाव या शब्दावर अनुस्वार दिल्याने या गावाचा अनादर केल्यासारखे होईल, तेव्हा याचे अधिकृत नावच प्रचलित करूया. व आपण सर्वजण त्यासाठी कटिबद्ध होऊया.

आजही शासकीय, निमशासकीय शाळा, महाविद्यालये, बँका, पोष्ट ऑफिस तसेच इतर व्यवहारात पेठ वडगाव या शब्दावर अनुस्वार नसताना तो अनुस्वार आपण चुकिच्या पद्धतीने देत आहोत. अनुस्वारासंबंधी जे मुख्य चार नियम व आठ पोटनियम आहेत, त्यामध्ये गावांच्या नावाचा उच्चार करताना अनुस्वार नसेल, तर तो देऊ नये. असे स्पष्ट नियम आहेत. तेव्हा पेठ वडगाव शब्दातील व या शहरातील संबंधित मा नगराध्यक्ष, सर्व नागरिक, नगरसेवक, शासकीय–निमशासकीय अधिकारी, पत्रकार, प्रतिष्ठित कार्यकर्ते, अभ्यासक इत्यादींना आवाहन करण्यात येते की, पेठ वडगाव या शब्दातील 'गा' या वर्णावर अनुस्वार देऊ नये. लेखनविषयक नियमानुसार गावाच्या नावावर अनुस्वाराचा उच्चार स्पष्ट नसेल तर तो, देण्याची पद्धत नाही तेंव्हा पेठ वडगाव हा शब्द मूळ उच्चारानुसार लिहावा, हि नम्र विनंती.

---

अधिक माहितीसाठी :

**नियम** १.१ स्पष्टोच्चारित अनुनासिकाबद्दल शीर्षबिंदू (अनुस्वार) द्यावा.

१.५ काही शब्दांमधील अनुस्वारांचा उच्चार अस्पष्ट असतो, कधीकधी तो उच्चारलादेखील जात नाही, तेव्हाही अशा शब्दांवर अनुस्वार देऊ नये.

## मराठी विभाग सहभागी विद्यार्थी – शिक्षक

१) प्रा. डॉ. प्रशांत गायकवाड – मो. ९८२२४३८७४३

२) प्रा. रामचंद्र ढवळे – मो. ९९२१९२३३३२

१) शिवानी भगवान खोत. [signature]

२) अंकिता कलगोंडा मिरजे. A.Miraje

३) भाग्यश्री उत्तम चव्हाण. [signature]

४) आकांक्षा अश्विनकुमार जाधव. A.A.Jadhav

५) शिवराज सुनिल जामदार. [signature]

६) शितल राजेंद्र जासूद. S.Jasud

७) अमित संभाजी कोळी. [signature]

८) प्राजक्ता प्रमोद पाटील. P.P.Patil

९) वैष्णवी यशवंत पाटील. [signature]

१०) इरफान हिम्मत मुल्लाणी [signature]

११) सुहेल जहाँगीर तांबोळी [signature]

आपले विश्वासू,

डॉ. प्रशांत गायकवाड,

प्रा. रामचंद्र ढवळे

(मराठी विभाग)

## नियम १[संपादन]

अनुस्वार

### नियम १.१[संपादन]

स्पष्टोच्चारित अनुनासिकाबद्दल शीर्षबिंदू द्यावा.

- उदाहरणार्थ: गुलकंद, चिंच, तंटा, आंबा

### नियम १.२[संपादन]

तत्सम शब्दातील अनुनासिकाबद्दल विकल्पाने पर-सवर्ण लिहिण्यास हरकत नाही.मात्र अशा वेळी अनुस्वारानंतर येणाऱ्या अक्षराच्या वर्गातील अनुनासिकच पर-सवर्ण म्हणून वापरावे.

- उदाहरणार्थ: 'पंकज=पङ्कज', पञ्चानन, पंडित=पण्डित, अंतर्गत=अन्तर्गत, अंबुज=अम्बुज.

### नियम १.३[संपादन]

पर-सवर्ण लिहिण्याची सवलत फक्त तत्सम शब्दांपुरती मर्यादित आहे. संस्कृत नसलेले मराठी शब्द शीर्षबिंदू (अनुस्वार) देऊनच लिहावेत.

- उदाहरणार्थ: 'दंगा, झांज, बंड, खंत, संप' हे शब्द 'दङ्गा, झाञ्ज, बण्ड, खन्त, सम्प' असे लिहू नयेत.

### नियम १.४[संपादन]

अर्थभेद स्पष्ट करण्यासाठी कधीकधी पर-सवर्ण जोडून शब्द लिहिणे योग्य ठरते.

- उदाहरणार्थ:
  - वेदांत=वेदांमध्ये, वेदान्त= तत्वज्ञान,
  - देहांत=शरीरांमध्ये, देहान्त= मृत्यू.

### नियम १.५[संपादन]

काही शब्दांमधील अनुस्वारांचा उच्चार अस्पष्ट असतो. कधीकधी तो उच्चारलादेखील जात नाही. अशा शब्दांवर अनुस्वार देऊ नये.

- उदाहरणार्थ: 'हसणे, धांवणे, जेव्हां, कोठें, कधीं, कांहीं' हे शब्द 'हसणे, धावणे, जेव्हा, कोठे, कधी, काही' असे लिहावेत.

#

## नियम २:[संपादन]

अनुस्वार

### नियम २.१[संपादन]

य, र्, ल्, व्, श्, ष्, स्, ह् यांच्यापूर्वी येणाऱ्या अनुस्वारांबद्दल केवळ शीर्षबिंदू द्यावा. 'ज्ञ' पूर्वीचा नासोच्चारही केवळ शीर्षबिंदूने दाखवावा.

https://mr.wikipedia.org/s/4vh

* उदाहरणार्थ: संयम, संरचना, संलग्न, संवाद, दंश, दंष्ट्रा, मांस, सिंह, संज्ञा' हे शब्द 'संय्यम, संव्रचना, संल्लग्न, संव्वाद, दंव्श, दंव्ष्ट्रा, मांव्स, सिंव्ह, संव्ज्ञा' असे लिहू नयेत.

## नियम ३[संपादन]

अनुस्वार

### नियम ३.१[संपादन]

नामांच्या व सर्वनामांच्या अनेकवचनी सामान्यरूपांवर विभक्तिप्रत्यय व शब्दयोगी अव्यय लावताना अनुस्वार द्यावा.

* उदाहरणार्थ: लोकांना, मुलांनी, तुम्हांस, लोकांसमोर, घरांपुढे.

### नियम ३.२[संपादन]

आदरार्थी बहुवचनाच्या वेळीही असा अनुस्वार दिला पाहिजे.

* उदाहरणार्थ: राज्यपालांचे, मुख्यमंत्र्यांचा, तुम्हांला, आपणांस, शिक्षकांना, अध्यक्षांचे.

## नियम ४[संपादन]

अनुस्वार वरील नियमांव्यतिरिक्त कोणत्याही कारणांसाठी - व्युत्पत्तीने सिद्ध होणारे वा न होणारे - अनुस्वार देऊ नयेत.

* या नियमानुसार 'घरें, पांच, करणें, काळीं, नांव, कां, कांच, जों, घरीं' हे शब्द 'घरे, पाच, करणे, काळी, नाव, का, जो, घरी' असे लिहावेत.

भाषकांचे राज्य म्हणून १९६० साली महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतर,अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ पुरस्कृत केलेल्या मराठी लेखनविषयक चौदा नियमांना महाराष्ट्र शासनाने १९६२ साली मान्यता दिली. पुढे १९७२ मध्ये आणखी चार नवीन नियमांची भर घालून पूर्वीच्या नियमांतील त्रुटी महामंडळाकडून दूर करण्यात आल्या . अ. भा. मराठी साहित्य महामंडळ हे महाराष्ट्रातील साहित्य संस्थांचे प्रातिनिधिक मंडळ असल्यामुळे त्याने केलेल्या नियमावलीला महाराष्ट्र राज्य शासनाने मान्यता दिली आणि राज्यकारभारात व शिक्षणाच्या सर्व क्षेत्रांत तिचे पालन करण्याचे ठरविले.

* ता.क.:पुढील नियम आपल्या सदस्य पानावर किंवा चर्चा पानावर एका वेळी एक पहाण्या करिता **{{शुद्धलेखन}}** हा साचा लावावा.

  मराठी भाषेत ऍ हे अक्षर वापरत नाही, त्या ऐवजी अ‍ॅ हे अक्षर वापरतात.

  कृपया संगणकावर मराठी कसे वापरावे , क्ष | ज्ञ | अ‍ॅ | ऑ यांसारखी अक्षरे कशी लिहावी यां संबंधी माहितीसाठी युनिकोड हे पान पहावे.

## श्री विजयसिंह यादव कला व विज्ञान महाविद्यालय, पेठ वडगाव

### मराठी विभाग

### प्रमाण लेखन विषयक नियम जनजागृती प्रकल्प अहवाल २०१८-२०१९

श्री विजयसिंह यादव कला व विज्ञान महाविद्यालय, पेठ वडगाव ता. हातकणंगले जि. कोल्हापूर यांचे वतीने सन **२०१८-२०१९** या शैक्षणिक वर्षात मराठी विभागातील बी.ए. भाग – ३ चे विद्यार्थी व प्रा. डॉ. प्रशांत गायकवाड आणि प्रा. रामचंद्र ढवळे यांचे वतीने प्रमाणलेखनविषयक नियम जनजागृती शोध प्रकल्प यशस्वीपणे राबविण्यात आला. याचाच एक भाग म्हणून **'पेठ वडगांव' नाही तर 'पेठ वडगाव'** लिहिणेबाबत वडगाव शहरामध्ये जनजागृती करण्यात आली.

यापूर्वी मराठी विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी एक दिवशीय साहित्य संमेलन परिसरातील कवी–कवियित्रिंचे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी काव्यसंमेलन, पेठ वडगाव परिसरातील उखाण्यांचे संकलन, तसेच मराठीतील नामवंत साहित्यिक चंद्रकुमार नलगे, डॉ.सुनिलकुमार लवटे, डॉ विश्वनाथ शिंदे, डॉ. रवींद्र ठाकूर, डॉ. कृष्णा किरवले, डॉ. अनिल गवळी, डॉ. आ. ह. सांळुखे, वसंतराव गायकवाड इत्यादी साहित्यकांच्या मुलाखती घेण्यात आल्या तसेच अनेक उपक्रमांचे यशस्वी आयोजन करण्यात आले.

प्रमाणलेखन विषयक नियम, लेखनकोश, ऐतिहासिक कागदपत्रे यांचा अभ्यास करून हा संशोधन प्रकल्प हाती घेणेत आला. याचाच एक भाग म्हणून अभ्यास करत असताना नगरपालिका, शासकीय कार्यालये शाळा, महाविद्यालये, बँका, पोस्ट ऑफिस इ. कार्यालयांमध्ये पेठ वडगाव हा शब्द 'पेठ वडगांव' असा चुकीच्या पध्दतीने लिहिला असल्याचे आढळून आले. यासाठी लेटरहेड बॅनर, डिजिटल बोर्ड, नेम प्लेट इ. ची सॉप्टकॉपी व हार्ड कॉपी ही अभ्यासासाठी ताब्यात घेणेत आली.

पेठ वडगाव या गावाला सुमारे **१५०** वर्षांपेक्षा अधिक जुनी परंपरा व मोठा इतिहास आहे. गावात वडांच्या झाडांची अधिक असल्यामुळे त्याचे वडगाव हे नाव पडल्याचे बोलले जाते. पेठ वडगाव या नावाआधी हे गाव राजाचे वडगाव, कसबा वडगाव म्हणून प्रसिध्द होते. शेजारीच 'मौजे वडगाव' या नावाचे एक छोटेसे दुसरे गाव आहे. नंतरच्या काळात पेठ वडगाव ही मोठी बाजारपेठ असल्यामुळे यातील 'कसबा' या शब्द मागे पडून बाजारपेठेतील पेठ हा शब्द वडगाव या नावाच्या आधी येणेत आला व पुढे 'पेठ वडगाव' हीच या गावाची, शहराची स्वतंत्र ओळख निर्माण झाली.

स्पष्टोच्चारित अनुनासिकाबद्दल शीर्षबिंदू (अनुस्वार) द्यावा. अशा स्वरूपाचा प्रमाणलेखनविषयक नियम **१९६२** साली झालेला असताना आजही पेठ वडगाव या शब्दातील 'गा' या वर्णावर अनुस्वार पाहिला. ही गोष्ट अनेक लोकांकडून व विविध कार्यालयांकडून कळत न कळतपणे चुकीच्या पध्दतीने सुमारे **५७** वर्षापासून घडत असल्याचे निदर्शनास आले. तसेच वडगाव ही मोठी बाजारपेठ असल्यामुळे पेठ वडगाव हा शब्द सुटा लिहावा की एकच लिहावा याविषयी देखील मोठा संभ्रम आहे. 'वडगाव' या नावाची अनेक गावे आहेत. एकाच

नावाची अनेक गावे असतात तेव्हा ती स्वतंत्र ओळखण्यासाठी त्या त्या गावाच्या वैशिष्टयांवरून विशेषण लावण्याची प्रथा आहे. बाजारपेठे मधील पेठ हा शब्द स्वतंत्र असून ते विशेषण आहे. त्यामुळे ते लिहिताना वडगाव या नावाच्या गावाला जोडून न लिहिता पेठ वडगाव असे स्वतंत्र लिहावे. त्यामध्ये गावांच्या नावाचा उच्चार करताना अनुस्वार तसेच, तर तो देवू नये. असे स्पष्ट नियम आहेत.

पेठ वडगाव हे ऐतिहासिक गाव असून याला मोठी सांस्कृतिक परंपरादेखील आहे. या गावाच्या संस्कृतीविषयी प्रेम व्यक्त करताना भाषाविषयक सलगता बाळगूया. पेठ वडगाव या शब्दावर अनुस्वार दिल्याने या गावाचा अनादर केल्यासारखे होईल तेव्हा याचे अधिकृत नावच प्रचलित करूया. असे जाहीर आवाहन करण्यात आले.

पेठ वडगाव नगरपालिका प्राथमिक आरोग्य केंद्र, वडगाव पोलीस स्टेशन, पोस्ट ऑफिस, दिवाणी व फौजदारी कनिष्ट न्यायालय, एस.टी. महामंडळ कार्यालय, एम.एस.ई.बी. कार्यालय, सेतू सुविधा केंद्र,तलाठी कार्यालय इ. पेठ वडगाव मधील कार्यालयात तिभागाच्या वतीने निवेदन देण्यात आला त्याला सर्वांनीच अनुकूल प्रतिसाद देत विद्यार्थ्यांना सहकार्याचा हात दिला. याच बरोबर सुमारे २० शाळा व महाविद्यालयांच्या कार्यालयातही निवेदन देण्यात आले. त्यामध्ये बळवंतराव यादव हायस्कूलच्या मराठी शाखेच्या व वडगाव विद्यालय व ज्युनिअर कॉलेजच्या लेटरहेड वर पेठ वडगाव हा शब्द बरोबर लिहिल्याचे आढळते. एम. एस. ई. बी कार्यालय व तलाठी कार्यालयाने शब्दात दुरूस्ती करून पेठ वडगाव हा योग्य शब्दाचा वापर करण्याची कार्यवाही केली.

प्रा. डॉ. प्रशांत गायकवाड व प्रा. रामचंद्र ढवळे यांच्या मार्गदर्शनाखाली कु. शिवानी भगवान खोत, कु. अंकिता कलगोंडा मिरजे, कु. भाग्यश्री उत्तम चव्हाण, कु. आकांक्षा अश्विनकुमार जाधव, शिवराज सुनिल जामदार, कु. शीतल राजेंद्र जासूद, अमित संभाजी कोळी, कु प्राजक्ता प्रमोद पाटील, कु. वैष्णवी यशवंत पाटील इत्यादी विद्यार्थ्यांनी या शोध प्रकल्पात सक्रिय सहभाग घेतला. ठिकठिकाणी निवेदन देण्यासाठी सुमेद शशिकांत कांबळे, सुहेल जहॉगीर तानेखान, रामा गोविंद लोले, इरफान हिम्मत मुल्लाणी, यानी तसेच माजी विद्यार्थीनी जयश्री जयसिंग शिंदे, इत्यादींनी विशेष सहकार्य केले

या शोध प्रकल्पासाठी संस्था अध्यक्ष मा. गुलाबराव पोळ, उपाध्यक्षा श्रीमती विजयादेवी यादव वहिनीसाहेब, सचिव मा. विद्याताई पोळ, महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. विजया चव्हाण यांचे विशेष असे मार्गदर्शन व प्रात्साहन लाभले

मराठी विभाग

दि. २७/०२/२०१९

**डॉ. प्रशांत गायकवाड**

**प्रा. रामचंद्र ढवळे.**

# ‘पेठ वडगांव नव्हे पेठ वडगाव लिहा’

प्रतिनिधी
पेठवडगाव



पेठ वडगाव : प्रमाणपत्र लेखन विषयक नियम जनजागृती विषयक प्रकल्प सादर करताना उपस्थित शिक्षक व विद्यार्थी व मान्यवर.

पेठ वडगाव येथील श्री. विजयसिंह यादव कला व विज्ञान महाविद्यालयाच्या मराठी विभागातील विद्यार्थी व डॉ.प्रशांत गायकवाड आणि रामचंद्र ढवळे यांचेवतीने 'प्रमाण लेखन विषयक नियम जनजागृती शोध प्रकल्प' राबविण्यात आला. याचाच एक भाग म्हणून 'पेठ वडगांव' नाही तर 'पेठ वडगाव' लिहावे असे आवाहन करून वडगाव शहरामध्ये जनजागृती करण्यात आली.

पेठ वडगाव या गावाला सुमारे १५० वर्षांपेक्षा अधिक जुनी इतिहास आहे. स्पष्टोच्चारित अनुनासिकाबद्दल शीर्षबिंदू (अनुस्वार) द्यावा. अशा स्वरूपाचा प्रमाणलेखन विषयक नियम १९६२ साली झालेला असताना सुमारे ५७ वर्षांपासून पेठ वडगाव या शब्दातील 'गा' च्या वर्णावर कळत नकळतपणे चुकीच्या पध्दतीने अनुस्वार दिला जातो. गावांच्या नावाचा उच्चार करताना अनुस्वार नसेल, तर तो देऊ नये, असे स्पष्ट नियम आहेत.

या बाबत यादव महाविद्यालयाच्या मराठी विभागातील विद्यार्थी व प्राध्यापक यांनी 'प्रमाण लेखन विषयक नियम जनजागृती शोध प्रकल्प' राबविला. याचा एक भाग म्हणून 'पेठ वडगाव' लिहावे असे आँवाहन केले. शिवानी खोत, अंकिता मिरजे, भाग्यश्री चव्हाण, आकांक्षा जाधव, शिवराज जामदार, अमित कोळी, शितल जासूद, प्राजक्ता पाटील, वैष्णवी पाटील, सुमेद कांबळे, सुहेल तानेखान, रामा लोले, इरफान मुलाणी यांनी प्रकल्प हाती घेतला.

साहित्यिक चंद्रकुमार नलगे, डॉ. सुनिलकुमार लवटे, डॉ. विश्वनाथ शिंदे, डॉ. रविंद्र ठाकूर, डॉ. कृष्णा किरवले, आप्पासाहेब खोत, डॉ. आ. ह. साळुंखे, वसंतराव गायकवाड आदी साहित्यिकांच्या मुलाखती घेण्यात आल्या. तसेच अनेक उपक्रमांचे यशस्वी आयोजन करण्यात आले.